पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ५५७ /२०१५
दिनांक : २४/०७/२०१५

प्रति,
मा......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची **विशेष सभा** दिनांक **२८/०७/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची **विशेष सभा** मंगळवार दिनांक **२८/०७/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती विशेष सभा
**कार्यपत्रिका क्रमांक – २३**

**दिनांक : २८/०७/२०१५** **वेळ : दुपारी - ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची विशेष सभा मंगळवार दिनांक **२८/०७/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) मा.अमिना पानसरे, मा.मंदा आल्हाट, मा.संगिता पवार, मा.स्वाती साने, व मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव - नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये महिलांना संगणक प्रशिक्षण देणे ही योजना कार्यरत असून या योजनेत काही सुधारित बदल करणे आवश्यक आहे तरी प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ नुसार या योजनेत सुधारित बदल करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) मा.अमिना पानसरे, मा.मंदा आल्हाट, मा.संगिता पवार व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव - नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या बालवाडयांतील मुलांना खाऊ/पूरक पोषक आहार उपलब्ध करुन देणेकामी मा.महिला बालकल्याण समिती ठराव क्र.३१ दि.१२/९/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. परंतु देण्यात येणारा आहार बालकांस देणे योग्य असल्याची दैनंदिन तपासणी योग्य त्या यंत्रणेमार्फत करणे आवश्यक आहे. कारण अशा प्रकारच्या योजनेमधुन मुलांना अन्न विष बाधा यासारख्या घटना यापुर्वी अनेक ठिकाणी घडल्या आहेत परंतु मुलांना वाटप करण्यात येणा-या पोषक आहाराची योग्य त्या शासकीय यंत्रणेमार्फत दैनंदिन तपासणी करणे व त्यानंतर आहाराचे वाटप करणे याबाबी क्लिष्ट आहेत त्यामुळे लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सदरची योजना सद्यस्थितीत स्थगीत ठेवण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५५७/२०१५
दिनांक : २४/०७/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

<u>**प्रपत्र - अ**</u>

| सध्याची योजना | प्रस्तावित योजना |
|---|---|
| **योजनेचे नाव :-** स्वयंरोजगाराकरिता महिलांना संगणक प्रशिक्षण देणे | **योजनेचे नाव :-** स्वयंरोजगाराकरिता महिलांना संगणक प्रशिक्षण देणे |
| **योजनेचे स्वरुप :-** कोणत्याही जाती धर्माच्या महिला व मुलींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या करिता शासनाने निश्चित केलेल्या संगणकीय अभ्यासक्रमाचे (MSCIT अथवा शासनाने वेळो वेळी निश्चित केलेले संगणक प्रशिक्षण) प्रशिक्षण देण्यात येईल. | **योजनेचे स्वरुप :- महिलांना अदयावत संगणक कौशल्य ज्ञात होणेसाठी एम.एस.सी.आय.टी., डिटीपी, टॅली, वेब डिझायनिंग, मराठी व इंग्रजी टायपिंग, विदयापीठाकडील मान्यताप्राप्त संगणकीय कोर्सेस / एम.के.सी.एल. मान्यता प्राप्त वेव्ह व KLIC संगणक प्रशिक्षण देण्यात येईल.** |
| **लाभाचे स्वरुप :- एम.एस.सी.आय.टी., डिटीपी, टॅली इ.संगणक प्रशिक्षण देण्यात येईल.** | **लाभाचे स्वरुप :- एम.एस.सी.आय.टी., डिटीपी, टॅली, वेब डिझायनिंग, मराठी व इंग्रजी टायपिंग, विदयापीठाकडील मान्यताप्राप्त संगणकीय कोर्सेस / एम.के.सी.एल. मान्यता प्राप्त वेव्ह व KLIC संगणक प्रशिक्षण देण्यात येईल.** |
| **प्रमुख अटी व शर्ती** | **प्रमुख अटी व शर्ती** |
| १. लाभार्थींना विहीत नमुन्यात अर्ज करावा लागेल. | १. लाभार्थींना विहीत नमुन्यात अर्ज करावा लागेल. |
| २. लाभार्थी किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | **२. प्रशिक्षण देणारी संस्था जी शैक्षणीक अर्हता ठरवेल ती लागु राहिल** |
| ३. लाभार्थींचे पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्य असावे. | ३. लाभार्थींचे पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्य असावे. |
| ४. लाभार्थीला सहभाग शुल्क एकूण फी च्या १० टक्के म.न.पा. कोषागारात भरावे लागेल. | ४. लाभार्थीला सहभाग शुल्क एकूण फी च्या १० टक्के म.न.पा. कोषागारात भरावे लागेल. |
| ५. लाभार्थीस महानगरपालिकेने निश्चित केलेल्या संस्थेमध्ये प्रशिक्षण घ्यावे लागेल. | ५. लाभार्थीस महानगरपालिकेने निश्चित केलेल्या संस्थेमध्ये प्रशिक्षण घ्यावे लागेल. |
| ६. लाभार्थीस अशा प्रकारची मदत देणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. | ६. लाभार्थीस अशा प्रकारची मदत देणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. |
| ७. अर्जदार महिलेने अर्जासोबत आधार कार्डची प्रत सादर करणे आवश्यक राहिल. | ७. अर्जदार महिलेने अर्जासोबत आधार कार्डची प्रत सादर करणे आवश्यक राहिल. |

सही/-
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.